प्रत्येक क्षण हा काहीतरी
शिकवणारा असतो,
त्यामुळे आजच्या अडचणी
उद्याच्या यशाचा
पाया रचतील यावर विश्वास
ठेवा.

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १३९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.३१ डिसेंबर २०२४

## ‘थर्टी फर्स्ट’साठी महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे गजबजले !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, दापोली :** थंड आल्हाददायक वातावरणामुळे दापोलीसह जिल्ह्यातील गुहागर, रत्नागिरीतील गणपतीपुळे यासारखी पर्यटन स्थळे पर्यटकांनी हाऊस फुल झाली आहेत. नाताळ बरोबर थर्टी फस्ट असल्याने पर्यटकांची पावले कोकणातील या ठिकाणी वळली असल्याने सर्व हॉटेल ही बुक झाली आहेत.

जिल्ह्यातील गणपतीपुळे, आरेवारे, भाट्ये बिच, गुहागर बिच तसेच याबरोबर दापोली शहरापासून अवघ्या सात ते आठ किलोमीटर अंतरावर असणारा समुद्रकिनारा यामुळे पर्यटनाच्या जागतिक नकाशावर येथील पर्यटन स्थळाला एक महत्त्वाचे स्थान आहे. सध्या नाताळच्या सुट्टीच्या निमित्ताने पर्यटनासाठी दापोलीसह जिल्ह्यातील पर्यटन स्थळे हाऊसफुल झाली आहे. यंदा हा सीझन रेकॉर्ड ब्रेक करणार असल्याचा या क्षेत्रातील जाणकारांचा अंदाज आहे. मात्र येथील अपुऱ्या सुविधा, ऐन सिझनच्या वेळी कमी पडणारी निवासव्यवस्था हे येथील प्रश्न अद्याप ‘जैसे थे’च आहेत. यासाठी शासनाने दापोली तालुक्यासह इतर पर्यटन स्थळांच्या ठिकाणचे पर्यटन व्यवसायाचे महत्त्व लक्षात घेऊन निवास व न्याहरी व्यवस्था नव्याने उभ्या राहाव्यात यासाठी विशेष प्रोत्साहन देता येईल का यावर विचार करायला हवा, असे मत काही पर्यटकांनी व्यक्त केले आहे.

पर्यटन व्यवसायाला सध्या सुगीचे दिवस आहेत, मात्र आता या व्यवसाय वाढावा तसेच अर्थकारणाला नव्याने चांगली दिशा मिळावी यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहेत. दापोली तालुका पर्यटन विकास आराखड्याच्या घोषणा आता पुरे झाल्या आता गरज आहे ती खऱ्या अर्थाने पर्यटन व्यवसायाला चालना देण्याची. नाताळ सणाला आलेल्या सुट्ट्यांनी दापोली तालुक्यातील मुरुड, कर्दे, लाडघर, आंजर्ले, दाभोळ, करजगाव, पाळंदे, हर्णे, केळशी हे प्रमुख समुद्रकिनारे पर्यटकांनी गलबजून गेले आहेत. स्वच्छ आणि पांढरी वाळूचे पुळण असलेले लांबचक समुद्रकिनारे लाभलेल्या दापोली तालुक्यातील कर्दे व मुरुड हे पर्यटनाचे केंद्रबिंदू बनले आहे. दापोली तालुक्याला दाभोळ ते केळशी हा ८० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. गेल्या आठ- दहा वर्षात



राज्यातील पुणे, मुंबई बरोबरच पश्चिम महाराष्ट्रातील सांगली सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यातील पर्यटकांना रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांची भुरळ पडली आहे. फेसाळणाऱ्या समुद्रालाटा, रात्रीचे मंद वारा आणि गुलाबी थंडी असे वातावरण जिल्ह्यातील सर्वच समुद्रकिनाऱ्यावर डिसेंबर महिन्यापासून जाणवू लागते.

समुद्र किनारपट्टीला असणाऱ्या बागायतींमुळे थंड हवामानाचा आनंद लुटणे समुद्रात स्नान करणे तसेच बीचवर वेगवेगळ्या खेळ खेळण्यात पर्यटक गुंतून जातात पाळंदे व मुरुड मध्ये वॉटर गेम, सँण्ड बाईक, पॅरासिलिंग, वॉटर पॅरासिलिंग, उंट व घोडागाडी सफर, सकाळच्या वेळेमध्ये डॉल्फिन सफर अशा अनेक खेळांमुळे पर्यटक इकडे आकर्षित होतात. दापोली शहराबरोबरच समुद्रकिनाऱ्यावरील नावातील ३ हजार पेक्षा अधिक निवास योजनेतील घरे हे ४ जानेवारी पर्यंत हाउसफुल झाल्याची माहिती उपलब्ध आहे. इतर पर्यटन स्थळांच्या ठिकाणी कमी अधिक प्रमाणात हॉटेल्स आणि निवास योजना ठिकाणे फुल झाली आहेत.

या हंगामात एक लाखावून अधिक पर्यटक दापोली तालुक्यातील विविध समुद्रकिनाऱ्यांबरोबरच कड्यावरचा गणपती, केशवराज मंदिर, याकूब बाबा दर्गा, मुरुडचे प्रसिद्ध दुर्गादेवी मंदिर, दाभोळ येथील चंडिका देवी मंदिर, उन्हवरे येथील गरम पाण्याचे कुंड, पन्हाळेकाझी येथील लेणी, हर्णे समुद्रातील सुवर्णदुर्ग, कणकदुर्ग, गोवा किल्ला, रमाबाई आंबेडकरांचे स्मारक, दापोलीतील कोकण कृषी विद्यापीठ, लाडघर येथील भव्य परशुराम पुतळा तसेच तांबडा पांढरा समुद्र आधी पर्यटन स्थळांना भेट देण्याचा अंदाज या क्षेत्रातील व्यवसायिकांनी वर्तवला आहे. तालुक्यातील पर्यटन जवळपास वर्षभर सुरू असते.

दापोली तालुक्यातील मुरुड कर्दे, लाडघर हे पर्यटकांचे पसंतीचे ‘हॉटस्पॉट’ आहेत. पर्यटकांची सुरक्षितता हा महत्त्वाचा विषय आहे. येणारा पर्यटक हा येथील समुद्राचा आनंद लुटण्यासाठी खोल समुद्रामध्ये पोहोचण्यासाठी जातो पुरेसे मार्गदर्शन व माहिती अभावी एखाद्या दुर्घटनेस सामोरे जावे लागते. पर्यटकांसाठी लाइफ गार्ड, लाईफजॅकेट, सूचना केंद्र असणे आवश्यक आहे.

नाताळ आणि नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने तसेच पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्वच पर्यटन स्थळांच्या ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक रत्नागिरी धनंजय कुलकर्णी यांनी सर्वांना शांततेत सण साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

## पिकअपच्या धडकेत युवकाचे निधन !



**अक्षराज : शरद भगत**

**दि.२९, मोरगाव (बारामती) :** मोरगाव हद्दीमध्ये निरा मोरगाव रस्त्यावर शिवनगर चौक येथे शुक्रवार दिनांक २७ डिसेंबर रोजी महिंद्रा पिक अप नवनाथ मिल्क्स प्रोडक्शन एम एच ४२एम ६२४८ या भरदाव गाडीने नवनाथ रामदास बालगुडे वय ३३ वर्षे युवकाला धडक दिली. धडकेत तरुण गंभीर जखमी झाला पिक अप चालक पळवून जाण्याचा प्रयत्न करत होता. परंतु सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बाळासो मारुती बालगुडे यांनी गाडी अडवून तरुणाला दवाखान्यात नेण्याची विनंती केली. मोरगाव येथिल मयुरेश्वर आय सी यु हॉस्पिटल येथे प्राथमिक उपचार करुण बारामती येथिल गिरीराज हॉस्पिटल येथे पेशंटला हलवण्यात आले परंतु तिथे ही उपचार व्यवस्थित न झाल्याने मेडीकल कॉलेज बारामती येथे पुढील उपचारासाठी पाठवले परंतु मशिनच्या व उपचारा अभावी पुणे येथिल ससुन हॉस्पिटल येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले. परंतु बारामती पुणे प्रवास करत असताना १०८महाराष्ट्र राज्य आपतकालीन रुग्णवाहीकेतून नेत असताना यवत या ठिकाणी च तरुण मृत पावला आहे. यवत येथिल ग्रामिण रुग्णालयात शवविच्छेदन केले.

शवविच्छेदनाचे रिपोर्ट व पुढील सर्व विधी झाल्या नंतर सुपे पोलिस स्टेशन येथे फिर्याद देणार असल्याचे मृत तरुणाच्या नातेवाईकांनी सांगितले.

## शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार- कृषीमंत्री कोकाटे



**दि.३०, मुंबई :** कृषी विभागातील केंद्र व राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे कृषीमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. राज्याचे कृषीमंत्री म्हणून पदभार घेताना मंत्रालय येथे ते बोलत होते.

कृषी विभागात आवश्यक तिथे सुधारणा करून शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले जाईल. केंद्र व राज्य शासनाच्या योजना राज्यात राबवताना अधिक समन्वय साधला जाईल. कृषी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. प्राधान्याने हाती घ्यावयाचे विषय, नवीन धोरणे यांचा अभ्यास करण्यात येईल. शेती आणि शेतकरी यांचा सर्वांगीण विकास हाच ध्यास असल्याचेही कृषीमंत्री ॲड.कोकाटे म्हणाले.

यावेळी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश गोंदावले, उपसचिव हेमंत म्हापनकर, उपसचिव संतोष कराड, उपसचिव प्रतिभा पाटील, उपसचिव अंबादास चंदनशिवे, उपसचिव प्रफुल्ल ठाकूर उपस्थित होते.

## अहिल्यानगरवर धुक्याची चादर, ग्रामीण भाग कोकणसारखा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** अवकाळीमुळे दिवसभर दाट धुके अन गुलाबी थंडी.. अशा सुंदर वातावरणात पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसर आज सकाळी धुक्यात हरवून गेला होता. या अशा वातावरणामुळे आपण नक्की दुष्काळी पारनेर तालुक्यात आहेत की... कोकण, महाबळेश्वर...! हेच समजत नव्हते. गुलाबी थंडी आणि दाट धुके... असे मनमोहक वातावरण पारनेरकरांनी सोमवारी अनुभवले. वातावरणात गारवा वाढल्यामुळे थंडीपासून बचावासाठी ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्या होत्या. सकाळी अकरा वाजेपर्यंत तालुक्यातील टाकळीढोकेश्वर परिसरामध्ये धुक्यामुळे सूर्यदर्शन झाले नव्हते. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात थंडीची तीव्रता वाढत आहे. सोमवारी तर परनेरकरांनी गुलाबी थंडीसोबतच दाट धुके व दवबिंदू अशा मनमोहक वातावरणाचा अनुभव घेतला. नगर शहरासह सावेडी, केडगाव उपनगर, भिंगारचा परिसर या भागांत सोमवारी सकाळी सगळीकडे धुक्याची चादर पसरली होती. पहाटेपासूनच नगर शहरासह परिसरातील उपनगरांत दाट धुके पसरले होते. धुक्यामुळे शहरातील रस्तेसुद्धा दिसत नव्हते. वाहनचालकांना रस्त्यांचा अंदाज येत नसल्याने नगर-मनमाड, नगर-पुणे, नगर-औरंगाबाद, अशा प्रमुख महामार्गांवरील वाहतूक संथगतीने सुरू होती. पंधरा ते वीस फुटांवरील घरे, वाहनेही धुक्यामुळे दिसत नव्हती. त्यामुळे वाहनांचे दिवे सुरू ठेवण्याशिवाय चालकांसमोर पर्याय नव्हता. उशिरापर्यंत दाट धुक्याचा अंमल असल्यामुळे सकाळी अकरा वाजेपर्यंत सूर्यदर्शन झाले नव्हते. कडाक्याच्या थंडीपासून वाचण्यासाठी अनेक ठिकाणी शेकोटी पेटवल्याचे चित्र दिसत होते; तसेच वाढत्या थंडीमुळे नागरिकांना उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे.

## टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांकडून ‘दैनिक अक्षराज दिनदर्शिकेचे’ जोरदार स्वागत !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अ.नगर) :** जिल्ह्यासह पारनेर तालुक्यात दैनिक अक्षराज दिनदर्शिकेची सर्वाधिक मागणी होत असुन टाकळी ढोकेश्वर व परिसरात तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये घरोघरी तसेच व्यवसायाच्या ठिकाणी, महत्त्वाचे कार्यालय या ठिकाणी दैनिक अक्षराजची दिनदर्शिका गेली असून टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी वर्षभराचे सण, उत्सव, तिथी आदींसह इत्यंभूत माहितीचा खजाना असणाऱ्या दैनिक अक्षराज दिनदर्शिकेचे आदर्श गाव टाकळीढोकेश्वर येथे आज सोमवारी सकाळी बसस्टँड मुख्य चौकात जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी टाकळी ढोकेश्वर गावचे सरपंच तसेच खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, काकणेवाडी गावचे सरपंच अशोक वाळुंज, ओबीसी सेलचे उपाध्यक्ष मळिभाऊ रांधवण, आदर्श गाव योजनेचे अध्यक्ष महेश पाटील, विलास नाईकवाडी, दिनेश रांधवण, प्रकाश गायकवाड, रघुनाथ गोरडे, रामचंद्र झावरे, गुलाब खिलारी, विठ्ठलराव पायमोडे, दिगंबर गोरडे,शिराज हवलदार, जयसिंग जाधव, बन्सी ढुस, रंजूशेठ निवडुंगे, बाळासाहेब झावरे, वाबळे सर,यांच्यासह परिसरातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.




**‘दैनिक अक्षराज मिडियाच्या’ माध्यमातून सर्वसामान्य जनतेला न्याय !**

दैनिक अक्षराज मिडियाने सर्वसामान्य जनतेला न्याय देताना जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडून काढीत जनतेच्या मनात आदरयुक्त दबदबा निर्माण केला आहे. सर्वसामान्य जनतेला खऱ्या अर्थाने आधार देण्याचे काम दैनिक अक्षराजने केले आहे. जनतेचे व्यासपीठ म्हणून गेली चार वर्षे वृत्तपत्र म्हणून काम करताना राजकारणातील दिग्गजांची पर्वा न करता सत्य लिखाण प्रसिद्ध करून ढोंगी राजकारण्यांचा बुरखा पाडण्याचे काम केले आहे. एक परिपूर्ण दिनदर्शिका देऊन त्यांनी धार्मिक संस्कृतीला चालना देण्यासाठीचा त्यांचा प्रयत्न आहे.

**– बाळासाहेब खिलारी, खासदार, निलेश लंके प्रतिष्ठान, पारनेर तालुका अध्यक्ष**

**‘दैनिक अक्षराज’ माध्यमातून शेतकऱ्यांना पाठबळ !**

दैनिक अक्षराज मिडियाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाठबळ देण्याचे काम होत असून आज शेतकरी अडचणीत सापडला असून केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची गरज आहे. यासाठी दैनिक अक्षराजने वेळोवेळी आवाज उठवला असुन दैनिक अक्षराज दिनदर्शिका माहितीपूर्ण आहे.

**– महेश पाटील, अध्यक्ष,आदर्श गाव टाकळीढोकेश्वर**

## माझ्या वडिलांना न्याय द्या, संतोष देशमुख यांच्या मुलीचे भावनिक आवाहन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, बुलडाणा :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करून कारवाई करण्याची मागणी करणारा महानिषेध मोर्चा आज सिंदखेडराजा येथे काढण्यात आला. या महामोर्चात हजारो सिंदखेडराजावासी नागरिकांसह दिवंगत संतोष देशमुख यांच्या कुटुंबातील सदस्यही सहभागी झाले.

राजमाता माँ जिजाऊ यांच्या जन्म स्थान असलेल्या लखुजी राजे जाधव राजवाडापासून मोर्चाला प्रारंभ करण्यात आला. ऐतिहासिक सिंदखेडराजा नगरीतील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करीत हा मोर्चा निघाला. सिंदखेडराजा तहसील कार्यालयावर काढण्यात आलेल्या या मोर्चात सरपंच संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी, मुलगा विराज, त्यांच्या भगिनी कल्पना चौधरी



यांच्यासह माजी आमदारद्वय डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. शशिकांत खेडेकर यांच्यासह शेकडो नागरिक सहभागी झाले होते. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणातील आरोपीना तात्काळ अटक करून कठोरातील कठोर शिक्षा देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या निषेध मोर्चामध्ये विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजबांधव, युवक, युवती मोठ्यासंख्येने सहभागी झाले होते. हा मोर्चा तहसील कार्यालयावर येऊन धडकला. नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले.

# संपादकीय



## विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज पुण्यतिथी आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लॉंच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लॉंचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहान केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ संशोधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इस्रो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबादच्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्ष पदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन!

# नववर्षाची प्रतिक्षा : गुप्त पार्टीची अपेक्षा!

संपूर्ण जगावर इंग्रजीचे सर्वाधिक प्राबल्य आहे. त्यामुळे साहजिकच १ जानेवारी हा दिवस नववर्षारंभ म्हणून धुमधडाक्यात त्याचे स्वागत होत आहे. महाराष्ट्रात म.फुले सन्मान दिन साजरा करण्यात येतो. कारण याच दिवशी कामगार बंधूंनी त्यांना महात्मा ही पदवी देऊन गौरविले होते. म्हणून तो दिवस उजाडण्याची अनेक दिवसांपासून प्रतिक्षा केली जाते. त्याबरोबरच याच नुतनवर्ष आरंभदिनी पार्टी करून नव्या वर्षाच्या तोंडावर पान खाऊन कसे थुंकता येईल? याचे मनसुबे रचले जातात. तशी मनोमन अपेक्षा बाळगली जाते. त्यामुळे वर्षारंभ लक्षात घेऊन जागतिक धुम्रपानविरोधी दिन पाळण्यात यावा, असेही ठरविले गेले. मात्र याकडे कानाडोळा केला जातो.

संकल्प तर भरमसाठ आणि अशक्यप्राय केले जातात. डोंगर, चंद्र, मंगळ, समुद्र, आकाशात बंगला बांधेन, अमुक धरेन, तमुक सोडेन. मात्र धुम्रपान विरोधावर ब्र शब्दही उच्चारणार नाही. म.फुले दांपत्याने बहुजनांसाठी याच दिवशी शाळा उघडली. म्हणून महाराष्ट्रात हाच दिवस म.फुले दांपत्य सन्मानदिन साजरा केला जातो. एकीकडे सुशिक्षितांची संख्या वाढली. त्याच्या समप्रमाणात वाईट व्यसनांधांची संख्याही फोफावली. हेच धुम्रपान- व्यसनांचे व्यस्तप्रमाण असावयास हवे होते. शिक्षणामुळे मती प्रकाशली, गुलामगिरी उधळून लावली व नवे-जुने कळू लागले. पण व्यसने- धुम्रपानाचे प्रमाण का वळू शकत नाही? स्वतःसह प्रियजनांच्या व इतरांच्याही आरोग्याचे वाभाडे निघाले. कसे का? याचे आत्मपरीक्षण व आत्मचिंतन होणे अत्यंत गरजेचे आहे.

सार्वजनिक ठिकाणी, सार्वजनिक वाहनातून प्रवास करताना, कामाच्या ठिकाणी आणि घरातील सदस्यांजवळ धूम्रपान केल्यास त्याच्यातील विषारी रासायनिक घटकांमुळे कर्करोग होण्याचा संभव अधिक असतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष तंबाखू सेवनामुळे हृदय विकार, फुफ्फुसाचा कर्करोग, गुंतागुंतीचे फुफ्फुसाचे आजार, क्षयरोग, स्ट्रोक, श्वसन संस्थांचे आजार होतात.




यापैकी ४० टक्के आजार हे धूम्रपानाशी संबंधित आहेत. महिलांच्या धूम्रपानामुळे वेगवेगळी गुंतागुंत निर्माण होते.

गर्भधारणेशी संबंधित गुंतागूंत, अपुर्या दिवसांची प्रसूती, कमी वजनाच्या बाळाचा जन्म इत्यादी. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम माहिती असतानाही आजही भारतात २४.३ टक्के भारतीय पुरुष आणि २.९ टक्के महिला तंबाखूचे सेवन करीत आहेत. केरळमधील काही गावांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत लहान मुलांद्वारे तंबाखू देऊन केले जाते. भारतातील काही विशिष्ट भागातील कुटुंबातील लग्न समारंभात पाहुण्यांना तंबाखू देऊन सन्मान करण्याची प्रथा आहे. मिझोरमच्या ग्रामीण भागात स्वागत करण्याची ताइबूर ही प्रथा तंबाखू देऊनच साजरी केली जाते.

तंबाखू सेवनाने तोंडाचा कर्करोग होण्याच्या दाट शक्यतेसह इतर आजारही बळावत आहेत. याबाबत जनजागृती होत असतानाही देशात २४.३ टक्के पुरुष आणि २.९ टक्के महिला तंबाखूचे सेवन करीत आहेत. दरवर्षी १ जानेवारी हा जागतिक धूम्रपान विरोधी दिन म्हणून पाळला जातो. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम दिसत असतानाही गेल्या कित्येक वर्षांपासून भारतीय माणसाच्या जगण्याशी आणि संस्कृतीशी जुळलेल्या तंबाखूला प्रतिबंध करणे शक्य झालेले नाही.

तरुणांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण वाढत असल्याचे आाढळून आले आहे.

तंबाखूमध्ये जवळपास चार हजार रसायने आढळतात. त्यात कमीत कमी २०० विषारी घटक आहेत. जे निकोटीन, कार्बन मोनोक्साईड, टार, अर्सेनिक, फॉर्मल्डिहाईड इत्यादींचा विषारी घटकांमध्ये समावेश होतो. तंबाखू खाण्यास वा धुम्रपानाची सवय जडण्यास कुटुंबातील वडीलधारी व्यक्तींचादेखील परिणाम होतो. याशिवाय सम वयस्कांचा प्रभाव, प्रयोग करून पाहणे, मतांचा प्रभाव, उत्सुकता, फिल्मी कलाकारांचे अवलोकन व नक्कल, चित्रपटातील मॉडेल्स, जाहिरातींचा प्रभाव, स्वतःचे मन शांत करण्यास, जल्लोस व आनंदोत्सव साजरा करण्यास, जागरुक राहण्यास, ताजेतवाने वाटण्यास, धाडस वाढवण्यास, कामाची क्षमता वाढवण्यास, विरंगुळा, टाइमपास आणि मानसिक आरोग्यासाठी तसेच निष्काळजी प्रवृत्ती असल्यास तंबाखूचे सेवन किंवा धुम्रपान केले जाते. भारतात १० पैकी सात स्मोकर्सना धूम्रपान धोकादायक आहे, याची जाणीव असते. ५३ टक्के लोक धूम्रपान सोडण्यास असमर्थ आहेत, अशी फाऊंडेशन फॉर अ स्मोक-फ्री वर्ल्डने प्रसारित केलेल्या माहितीतून हे सत्य उघड झाले आहे. भारतात दर दिवशी १०४ दशलक्षाहून अधिक लोक तंबाखू सेवनामुळे आपल्या आरोग्याशी खेळत असतात.

देशात रस्त्यारस्त्यांवर हाताने वळलेल्या विड्या क्षुल्लक किमतीत उपलब्ध असतात. या प्रकारामुळे भारतात मोठ्या प्रमाणात तंबाखू सेवन चालते. हा पारंपरिक सिगरेट प्रकार भरपूर लोकप्रिय असून त्यांच्यावर कराचा भार नाही. त्यामुळे भारतासारख्या देशात इतर देशांच्या तुलनेत तंबाखू नियंत्रणाचे निराळे पर्याय राबवून तंबाखू विरामाला चालना देऊन धोके कमी केले पाहिजेत. आपण म.फुले दांपत्य सन्मान दिनाचे स्मरण ठेवून नववर्षारंभी विश्व धुम्रपान विरोध केले, तर मोठ्या कौतुकास पात्र ठरू शकतो.

**!! सर्वांत सुमती निर्माण होणेस्तव नववर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरुजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

# कु.स्वरा लांजेकर हिची इस्रो, नासा अंतराळ संशोधन भेटीसाठी निवड

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२९, गुहागर (रत्नागिरी) :** रत्नागिरी जिल्हा परिषद आयोजित इस्रो, नासा अंतराळ संशोधन भेटीसाठी घेण्यात येणाऱ्या जिल्हा स्तर चाळणी परीक्षेसाठी गुहागर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा मुंढर नं. १ ची विद्यार्थिनी कुमारी स्वरा संतोष लांजेकर ही पात्र ठरली.

त्या निमित्ताने शनिवार दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी शाळा व्यवस्थापन समितीच्या पार पडलेल्या सभेत अध्यक्ष सचिन चाळके यांच्या हस्ते कु.स्वरा हीचा जाहीर सत्कार करण्यात आला. प्रसंगी मुख्याध्यापक दशरथ कदम, पदविधर शिक्षक वैभव पवार




सहशिक्षक लक्ष्मण पारवे, मुंढर गावचे पोलीस पाटील नीलेश गमरे, विनायक लांजेकर, प्रभाकर चव्हाण, मानसी शिर्के व अनेक पालक उपस्थित होते. सर्वांनी स्वरा ला पुढील परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

१९ डिसेंबर २०२४ रोजी केंद्र स्तरावर गुहागर तालुक्यातील ५ वी ते ७ वीचे वर्ग असणाऱ्या सर्व जिल्हा परिषदेच्या शाळा, २६ डिसेंबर २०२४ रोजी केंद्रस्तरातून निवड झालेले १३८ विद्यार्थी निवड चाचणीला बसले होते. त्यापैकी गुणांनूक्रमे १० विद्यार्थी जिल्हा स्तर चाळणी परीक्षेसाठी १० विद्यार्थी पात्र ठरले.

## (थर्टी फर्स्ट)

दारू दुकाना समोर
पिदाडे उभेशांतपणे
शिस्तीत चाले रांगेत
ना चिडणे रागावणे

प्यायला हवी संगत
नको पिणे एकटेपणे
भेदभाव न जातपात
पिण्या समानताजाणे

पुन्हा सारे एक होती
होता क्वचीत भांडणे
शिकावे त्यांच्याकडून
एकमेकाजीव लावणे

आज्ञाधारी बायकोचे
ऐकून घेती निमुटपणे
प्याल्यावरती हरिश्चंद्र
सत्य वचन ते बोलणे

यायला उशीर झाला
कठीण सबब सांगणे
भोळे सांभ असती ते
जमत नाहीरे लपवणे

पलंग गादी न काही
कुठेही पडे शांतपणे
दरवळत राहतो वास
स्वर्ग यात्रा जीवंतपणे

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# जुनं नव्यात केवळ भावनिक समाधानाचा मेळ

जस जस दिवसाचं एक एक पान उलटत जातं आणि शेवटच्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत येऊन ठेपतं तस तस सरत्या वर्षाचा निरोप घेण्याची वेळ येते. कुणाचाही निरोप घेताना मन संमिश्र भावनांनी भरलेलं असतं. अगदी तसंच सरत्या वर्षाचा निरोप घेतानाही मन गलबलून येतं. या वर्षात काय काय केलं, काय चुकलं, काय शिकलो, काय अपूर्ण राहिलं किंवा काय समाधान देऊन गेलं याचा ताळेबंद मनात चालूच असतं.

निरोप घेणं इतकं सोपं नसतं, मग ते कुणाचंही असो...असं असलं तरी सरत्या वर्षाला निरोप देणं गरजेचं असतं. कारण या वर्षाने आपल्याला अनेक आठवणी, आनंद आणि बरच काही दिलेलं असतं. या सर्व आठवणींची शिदोरी घेऊन नव्या वर्षात पदार्पण करायचं असतं. मागे वळून पाहताना जाणा-या वर्षाला निरोप देताना मनात संमिश्र भावनांचा कल्लोळ असतो. तयारी वर्षा अखेरची सरत्या वर्षाला निरोप देताना कुणी सहकुटुंब, मित्र परिवार वा नातेवाईक यांच्या बरोबर वेगवेगळ्या ठिकाणी एकत्र येतात. कुणी पार्ट्यात मदमस्त होतात, तर कुणी इतर कार्यक्रम ठेवतात. पण हेतू मात्र एकच असतो.

खरं तर आपलं नवीन वर्ष गुढीपाडव्याला सुरू होतं. आपले सण-उत्सव हे ऋतुमानाप्रमाणे आपण साजरे करतो. गुढीपाडव्याला झाडांची जुनी पालवी गळून नवीन पालवी फुटते. सर्वसृष्टी नवचैतन्याने बहरून जाते. त्यावेळेला माणसाच्या मनामध्ये निसर्गाकडे पाहताना आनंदाचा बहर येतो. आजकाल हे आपण विसरत चाललो आहोत आणि १ जानेवारीपासून आपण नवीन वर्ष साजरे करू लागलो आहोत.

सरत्या वर्षाला जेव्हा आपण निरोप देतो, तेव्हा मनामध्ये नवीन आशा-आकांक्षा जन्म घेतात. नव्या उमेदीने त्या साकार करण्याची इच्छा मनात जागृत होते. ज्या वेळेला जुन्या वर्षात घडलेल्या अप्रिय घटना विसरून आपण नवीन वर्षात पदार्पण करतो, त्या वेळेला नवीन सकारात्मक ऊर्जा आपल्या सुप्त मनात कार्य करू लागते.

पण नववर्ष साजरे करण्याची परंपरा हजारो वर्ष जुनी आहे. १५३ ईसापूर्व रोममध्ये याची सुरुवात झाली. तेव्हा लोक १ मार्चला नवीन वर्ष साजरे करायचे. ४६ बीसी मध्ये ज्युलियस सीझरच्या सौर-आधारित कॅलेंडरमध्ये १ जानेवारी रोजी साजरा केला जाऊ लागला. रोमन साम्राज्यात ही प्रथा मोठ्या प्रमाणावर स्वीकारली गेली. १५८२ मध्ये ग्रेगोरियन कॅलेंडर लागू झाल्यानंतर १ जानेवारी हा नवीन वर्षाचा प्रारंभ म्हणून साजरा केला गेला. नवीन वर्षाचा उत्सव प्रथम किरिबाटीमध्ये साजरा करण्यात आला आणि आता हा उत्सव हळूहळू पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकू लागला.

दरवर्षी ३१ डिसेंबरच्या रात्री लोकं जुन्या वर्षाला निरोप देतात आणि रात्री १२ वाजता अनेक आशा आणि स्वप्नांसह मोकळ्या हातांनी नवीन वर्षाचं स्वागत करतात. प्रत्येक सरतं वर्ष जातांना आपल्याला भरपूर काही शिकवून जातं आणि नवीन वर्ष येतांना आपण त्या शिकवणीतूनच नवीन संकल्प घेऊन नवीन स्वप्नांची शिदोरी बांधत असतो.

खरं तर येणारे नवीन वर्ष आपल्यासोबत नवीन आनंद, नवीन स्वप्न आणि भरपूर उत्साह घेऊन येत असतं. त्यामुळे जगभरातील लोक नवीन वर्षाचं वेग-वेगळ्या हटके पद्धतीने स्वागत करताना दिसतात. आता सरतं वर्ष हे मावळतीला चाललं आहे आणि नवं वर्ष उंबरठ्यावर आहे. मागील वर्षाचे हिशेब मागे राहिले आहेत, त्याची जागा नवीन वर्षाच्या संकल्पांनी घेतली जाणार आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला जवळजवळ प्रत्येकच घरातले दिवे मध्यरात्रीपर्यंत सुरू असते. त्यामुळे देश रात्रीसुध्दा जागा असतो असं म्हणायला हरकत नाही. सरत्या वर्षाला निरोप देत असताना कटू-गोड आठवणींची सोबत असते. हे वर्ष खूप काही देऊन आणि शिकवून जाते. त्यामुळे हे सरतं वर्ष अनेक प्रकारे प्रेरणादायी आणि आश्चर्यकारक ठरते. याच आश्चर्यामुळे सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केल्या जातं. हा सोहळा जेवढा नेत्रदीपक असतो, तेवढाच मनाला सुखावणारा आणि नवी उमेद देणारा ठरतो. सरतेशेवटी एवढंच म्हणावंस वाटते.

**सरत्या वर्षाला निरोप देऊ...**
**जीवनगाणे नव्याने गाऊ...**

**शब्दस्पर्शी - सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सायन पनवेल महामार्ग, शहरातील मुख्य रस्त्यांवर डीप क्लीनिंग मोहीम




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** स्वच्छ नवी मुंबई शहर सर्व दृष्टीने स्वच्छ असावे याकरिता दररोजच्या नियमित स्वच्छतेप्रम ाणेच शनिवार व रविवार या सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभाग व स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष यांच्या वतीने दुर्लक्षित व पडीक जागांची तसेच महानगरपालिकेच्या अखत्यारीत नसलेल्या सायन पनवेल महाम ार्गावर सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पदपथांच्या कडेला घट्ट झालेली माती तसेच झाडांच्या अस्ताव्यस्त वाढलेल्या फांद्या आणि पालापाचोळा यांची बारकाईने स्वच्छता करण्यात आली. नेरूळ येथील एलपी जंक्शन पासून नेरूळ रेल्वे स्टेशन आणि नेरूळ रेल्वे स्टेशन ते हावरे जंक्शन तसेच हावरे जंक्शन ते अपोलो जंक्शन अशा सर्व बाजूंच्या मुख्य रस्त्यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे सायन पनवेल हायवेवर ही साफसफाई करण्यात आली.

विशेष म्हणजे पालापाचोळा व कचरा उचलून झाल्यानंतर महानगरपालिकेच्या अत्याधुनिक फॉगर्स मशीनद्वारे स्वच्छ केलेले पदपथ, रस्ते आणि दुर्लक्षित जागा पाणी मारून स्वच्छ करण्यात आल्या. महत्त्वाचे म्हणजे यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या मलप्रक्रिया केंद्रातून शुद्ध केलेल्या प्रक्रियाकृत पाण्याचा वापर करण्यात आला. अशाप्रकारे फॉगर्स वाहनाद्वारे रस्ते सफाई केल्याने हवेतील धुळीचे प्रमाण कमी होऊन प्रदूषणही कमी होणार आहे. अशाच प्रकारची सखोल स्वच्छता मोहीम तुर्भे विभाग कार्यालय परिसरात ही राबविण्यात आली. नियमित स्वच्छतेप्रमाणेच अशा प्रकारच्या डीप क्लिनिंग मोहिमा राबवून नवी मुंबई परिसरातील सर्वांगीण स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष दिले जात आहे.

## जिल्हा संयोजक पदी इंद्रजीत देवकते यांची निवड



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.३०, धाराशिव :** भारतीय जनता पक्षाचे सदस्यता अभियान संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहाने राबवले जात आहे. या अभियानाच्या अनुषंगाने धाराशिव जिल्ह्यासाठी नवी जबाबदारी वाटप करण्यात आली आहे. भाजप प्रदेश कार्यालयाकडून धाराशिव जिल्हा संयोजक पदी इंद्रजीत देवकते यांची निवड करण्यात आली आहे. सहसंयोजक म्हणून मीनाताई सोमाजी, विक्रांत संगशिट्टी, सुदाम पाटील, आणि मकरंद पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सोशल मिडिया प्रतिनिधी म्हणून श्किशोर तिवारी, तर (खढ) सेल प्रतिनिधी म्हणून जगदीश जोशी यांना जबाबदारी देण्यात आली आहे. भाजप कार्यकर्त्यांकडून या सर्वांच्या निवडीचे स्वागत करण्यात येत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. धाराशिव जिल्ह्यात भाजप सदस्यता अभियानाला आता आणखी बळ मिळणार आहे. या निवडीबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष संताजीराजे चालुक्य पाटील यांनी स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## नशेखोर विरोधात पोलीसांचे कारवाई सुरूच



**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.३०, कल्याण (ठाणे) :** नवीन वर्षाच्या अनुषंगाने कल्याण पोलीस उपायुक्त परिमंडल ०३ मधील पोलीस ठाणे हद्दी मोकळे मैदान, निर्जली स्थळे व रोडवरील अस्थापना यांच्यावर पोलिसानं तर्फे दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी एकूण १०८ नशेखोर विरोधात कारवाई करण्यात आली. तसेच रोडवर अति वेगाने वाहन चालवणारे आणि ट्रिपल सीट वाहन चालकांवर अशी एकूण ९२ कारवाई कल्याण मध्ये पोलिसांन कडून करण्यात आली. सध्या सर्व पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये संध्याकाळी वेळेस नाकाबंदी सुरुवातीला झाली असून पोलीसांचे हे मोहीम असेच चालू राहण्याची माहिती पोलीस उपायुक्त परिमंडल ०३ चे अतुल झेंडे यांनी दिली आहे.

## प्रा.घनश्याम गवळी यांचा सन्मान

**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.३०, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** परिक्रमा इंजीनियरिंग कॉलेज काष्टी येथील प्राध्यापक घनश्याम गवळी यांनी नुकतेच दुचाकी गाडीवर ४ देश व १५ राज्य, नेपाळ, भूतान, चायना बॉर्डर, बंगाल देश या देशातून तर महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, सिक्कीम, उत्तरांचल, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा, मेघालय, आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, छत्तीसगड या राज्यामधून आपला २४ दिवस दुचाकी गाडीवर प्रवास करून नुकतेच परतले या अभिमानास्पद व कौतुकास्पद कामगिरीमुळे त्यांचा परिक्रमा शैक्षणिक संकुलनाच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्राध्यापक अनिल पुंड यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्र.प्राचार्य मोहन धगाटे, विभाग प्रमुख प्रा.शिवाजी उदमले, प्रा.रवींद्र काळाने, प्रा.रोहन रंधवे,प्रा.तरटे, जीवन जाधव, सुरज वाळके हे उपस्थित होते. गवळी यांच्या कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक माजी मंत्री बबनरावजी (दादा) पाचपुते, संस्थेच्या अध्यक्षा डॉ.प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार विक्रमसिंह बबनरावजी पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड.प्रतापसिंह पाचपुते, अकॅडमिक डायरेक्टर प्रा.इंद्रायणी पाचपुते, डॉ.प्रा.संजीव कदम पाटील, प्राचार्य डॉ.सुनील निर्मळ, प्राचार्य डॉ.सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ.रमेश शिंदे, प्राचार्य डॉ.पांडुरंग ईथापे, प्राचार्य डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले आहे.

# २०२४ वर्षात डोंबिवली पोलिसांची प्रभावी कारवाई; गुन्हेगारीत लक्षणीय घट

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.३०, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पोलीस ठाण्याने केलेल्या कठोर आणि प्रभावी कारवाईमुळे २०२४ या वर्षात गुन्हेगारीच्या घटना लक्षणीय कमी झाल्या असल्याचे समोर आले आहे. गुन्हेगारांवर वेळोवेळी कठोर कारवाई करून, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कायद्यांनुसार कार्यवाही करण्यात आल्याने सार्वजनिक शांतता राखण्यात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे.



**मुख्य कारवाई पुढील प्रमाणे करण्यात आल्या. -**

१. खुनाचा प्रयत्न: गंभीर स्वरूपाचे

२. गुन्हे दाखल असून, त्यातील २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

२. जबरी चोरी: ९ आरोपींना अटक करून ९७,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत.

३. घरफोडी: १४ पैकी ८ गुन्हे उघड; १३ आरोपी अटकेत, ९.४२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत.

४. वाहनचोरी: ३७ पैकी १७ गुन्हे उघड, १२ आरोपींना अटक, ९.८ लाखांचा मुद्देमाल जप्त.

५. इतर चोरी: ३१ पैकी १५ गुन्हे उघड, १८ आरोपींना अटक, १.९९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत.

६. महिला अत्याचार: विनयभंगाचे २० गुन्हे उघड, २० आरोपींना अटक.

७. फसवणूक: २३ पैकी १७ गुन्हे उघड, १६ आरोपींना अटक.

८. दुखापत गुन्हे: ५० पैकी ४७ गुन्हे उघड, ५० आरोपींना अटक.

तसेच **अनधिकृत व गैरकृत्यांवरही कडक पावले उचलण्यात आली –** अवैध दारू विक्री: ७१ गुन्हे दाखल; १.०३ लाखांचा मुद्देमाल जप्त. अंमली पदार्थ विक्री व सेवन: ७३ गुन्हे दाखल; ६.८५ लाखांचा मुद्देमाल जप्त. अवैध गुटखा विक्री: ४ गुन्हे दाखल; ४.२६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत. अनेक हरवलेल्या वस्तूंची पुढील प्रमाणे परत

फेड करण्यात आली , पोलिसांनी हरवलेले ५५ मोबाईल (७.२८ लाख किमतीचे) व इतर मौल्यवान साहित्य (२२ लाख रुपये) नागरिकांना परत केले. सन २०२४ मध्ये डोंबिवलीत चैन स्नॅचिंग, दरोडा, घरफोडी, चोरी, फसवणूक, आणि दुखापत यांसारख्या एकूण ७० गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत (MCOCA) २० आरोपींना अटक करून जेलम ध्ये पाठवण्यात आले आहे. तसेच हद्दपार, प्रतिबंधात्मक कारवाईतून अनेक गुन्हेगारांचे अनधिकृत प्रकार रोखण्यात आले आहेत ,पोलिसांच्या दैनंदिन गस्त पथकांच्या कामगिरीमुळे तसेच सीसीटीव्हीच्या साहाय्याने चोरी, फसवणूक, व अन्य गंभीर गुन्ह्यांवर परिणामकारक नियंत्रण ठेवता आले या कठोर कारवाईमुळे डोंबिवली शहरात शांतता प्रस्थापित झाली असून, गुन्हेगारीला आळा बसल्याचे नागरिकांनीही मान्य केले आहे. पोलीस निरीक्षक आणि त्यांच्या टीमच्या या कार्यामुळे २०२४ या वर्षात सुरक्षिततेचे उदाहरण डोंबिवलीत साकार झाले आहे.

# पंढरपूरात कृषी उडान विमानतळ लवकर व्हावे; आ.पाटील यांचे प्रयत्न

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३०, पंढरपूर :** माढा विधानसभाचे आमदार अभिजीत पाटील यांनी विकास कामाचा झपाटा लावलेला दिसत आहे. निवडणुकीमध्ये दिलेल्या वचनाला जागते मतदारसंघातील प्रश्नांचा उलगडा करत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वीच हिवाळी अधिवेशन नागपूर येथे मतदार संघातील ५५ प्रश्नांचा उलगडा करत विधानसभेच्या पटलावर नेऊन ठेवला आहे. तसेच दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची मुंबई येथे भेट घेऊन पंढरपूर येथे केंद्रीय कृषी उडान योजना अंतर्गत विमानतळ व्हावे. ही मागणी चे पत्र आमदार अभिजीत पाटील यांनी दिले.

सोलापुर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र पंढरपुराला दक्षिण काशी तर विठ्ठलाला महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणतात. विठ्ठलमंदिर अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्ती स्थान आहे. गोरगरिबांचा देव म्हणून श्री विठ्ठलाची ओळख आहे. पंढरपूरमध्ये वर्षातून चैत्री,



आषाढी, माघी व कार्तिकी एकादशी निमित्त मोठ्या यात्रा भरतात..त्यातील दरवर्षी आषाढी एकादशीला लाखो भाविक येथे वारीसाठी व श्री विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी येत असतात.

अशा या भारताची दक्षिण काशी समजल्या जाणार्या श्रीक्षेत्र पंढरपूर येथे केंद्रीय 'कृषी उडान योजना २.०' या योजनेअंतर्गत विमानतळ असणे गरजेचे आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विमानतळ झाल्यास श्रीक्षेत्र शिर्डी प्रमाणे धार्मिक पर्यटन स्थळ असलेल्या पंढरपूरचाही विकास होईल. या विमान सेवेमुळे अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूर इत्यादी तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्या भाविकांसाठी गतिमान वाहतुकीची सुविधा उपलब्ध होईल. त्याशिवाय परदेशातील भाविकांची रिघ वाढेल, मागील काही वर्षात आषाढी वारीत परदेशी भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने विमान सेवा सुरु झाली तर परदेशातील भाविकांसाठी सोयीचे ठरणार आहे.

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विमानतळ झाल्यास शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपर्यंत कमी वेळात आणि कमी खर्चात पोहोचवता येईल. शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन दूरच्या बाजारपेठांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत होईल आणि त्यांचे उत्पन्नात वाढ होईल. त्याचबरोबर शेतकऱ्यांना आर्थिक लाभासह त्यांच्या उत्पादनाला जगभरात ओळख मिळेल होईल असे आमदार अभिजीत पाटील म्हणाले आहेत.

# डोंबिवली मेडिकल असोसिएशनचा रामनगर पोलिसांच्या कथित गैरवर्तणुकीवर तीव्र निषेध

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.३०, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली मेडिकल (केमिस्ट) वेल्फ ेअर असोसिएशनने औषध विक्रेत्यावर रामनगर पोलिसांकडून झालेल्या कथित अपमानास्पद वागणुकीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संघटनेने दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांना निवेदन दिले असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. दिनांक २८ डिसेंबर रोजी, डोंबिवलीतील राहुल मेडिकल अँड जनरल स्टोअरचे मालक राहुल चौधरी यांना पोलीस कर्मचार्यांनी दुकानातून बाहेर खेचून, सर्वांसमोर अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप आहे. ही घटना रुग्ण आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत घडल्याचे म्हटले गेले आहे. राहुल मेडिकल हे नेहमीप्रमाणे रात्री उशिरापर्यंत रुग्णसेवा करत असताना, दुकान बंद करण्याची सक्ती केली गेली. यावेळी पोलिसांनी कोणत्याही ठोस कारणाशिवाय राहुल चौधरी यांना पोलीस स्टेशनला नेले आणि त्यांच्याविरुद्ध नोंद घेऊन दुसऱ्या दिवशी कोर्टात हजर राहण्याची नोटीस बजावली,

**डोंबिवली मेडिकल असोसिएशनने निवेदनाद्वारे पुढील मागण्या मांडल्या आहेत -**

१. या घटनेची तात्काळ चौकशी करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करावी.

२. औषध विक्रेत्यांना दुकान बंद करण्याची सक्ती करण्याची प्रक्रिया थांबवावी.



३. राहुल मेडिकलला दिलेले कोर्टाचे समजपत्र मागे घेण्यात यावे.

संघटनेने सांगितले की, जर यावर त्वरित उपाययोजना केली नाही, तर रात्री १० नंतर सर्व मेडिकल दुकाने बंद ठेवून तीव्र आंदोलन करण्यात येईल. यामुळे निर्माण होणाऱ्या कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी पोलीस प्रशासन जबाबदार असेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. औषध दुकाने ही रुग्णांच्या सेवेसाठी २४ तास कार्यरत असतात. अशा परिस्थितीत पोलिसांकडून असे वर्तन खपवून घेतले जाणार नाही. आम्हाला पोलिस प्रशासनासोबत पूर्वीप्रमाणेच मैत्रीपूर्ण संबंध ठेवायचे आहेत, असे संघटनेचे अध्यक्ष दिलीप देशमुख यांनी सांगितले. पोलीस प्रशासनाकडून या निवेदनावर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया मिळालेली नाही.

# सततच्या लहरी हवामानामुळे शेतकरी मेटाकुटीला

**दि.३०, गडचिरोली :** जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेले मानव-वन्यजीव संघर्षाचे सत्र २०२४ या वर्षातही कायम होते. २०२४ या वर्षात वाघांनी सहा तर रानटी हत्तींनी चार असे एकूण १० बळी घेतले. वन विभागाने पीडित कुटुंबांवर आर्थिक मदतीची फ ुंकर घातली असली तरी वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात आणखी किती बळी जातील, असा सवाल उपस्थित होत आहे.

गडचिरोली जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांपासून वाघांसह रानटी हत्तींनी धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो आहे. गेल्या वर्षभरात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात १० नागरिकांना जीव गम वावा लागला.

२०२४ या नवीन वर्षाची सुरुवात होताच ३ जानेवारीला वाकडी येथील एका महिलेचा बळी वाघाने घेतला. या वर्षाची सुरुवातच वाघाच्या हल्ल्याने झाली.

त्यानंतर याच महिन्यात वाघाने चार बळी घेतले. मानव-वन्यजीव संघर्षाचे हे



सत्र उन्हाळ्यातही सुरूच होते. भामरागड वन विभागात रानटी हत्तीने प्रवेश करून तेथील नागरिकांचे बळी घेतले. वाघ व हत्तींच्या हल्ल्याचा धोका थांबलेला नाही. २०२४ या सरत्या वर्षात कुरखेडा (सावरगाव) येथील महिलेचा बळी घेऊन मानव-वन्यजीव संघर्ष जिल्ह्यात अजूनही कायम असल्याची जाणीव करून दिली.

**२.२५ कोटींची मदत !**

जिल्ह्यात २०२४ या सरत्या वर्षात वाघ व हत्तींच्या हल्ल्यात ठार झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबाला वन विभागाच्यावतीने प्रत्येकी २५ लाख रुपयांची मदत देण्यात आले आहे. एकूण ९ जणांच्या कुटुंबीयांना २ कोटी २५ लाख रुपये अदा केले, तर शेवटच्या एका प्रकरणात प्राथमि क स्वरूपात ३० हजार रुपयांची सानुग्रह मदत देण्यात आली.

**वाघांच्या हल्ल्यात पाच जण ठार**

३ जानेवारी- मंगलाबाई विठ्ठल बोडे, वाकडी

७ जानेवारी-- सुषमा देवीदास मंडल, चिंतलपेठ

१५ जानेवारी- रमाबाई शंकर मुंजमकर, कोपरअल्ली

१८ जानेवारी-- बाबूजी नानाजी आत्राम, रेंगेवाही

१५ मे--पार्वता बालाजी पाल, आंबेशिवणी

६ डिसेंबर- शारदा महेश मानकर, कुरखेडा (सावरगाव)

**हत्तींनी घेतला चार जणांचा जीव**

२५ एप्रिल- गोंगलू रामा तेलामी, कियर

२५ एप्रिल- राजे कोपा हलामी, हिदूर

२५ एप्रिल- महारी देवू वड्डे, हिदूर

२४ ऑक्टोबर – शशिकांत रामचंद्र सतरे, नवेगाव (ता. मूल)

# पानगाव मध्ये वेळ अमावस्या उत्साह साजरी

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.३०, पानगाव (लातूर) :** पानगाव शिवार गजबजले वेळ अमावस्या (ग्रामीण भाषेत येळवस) हा सण पानगाव आणि पानगाव परिसरात शेत शिवारात दरवर्षी प्रमाणे बळीराजाने आपल्या परिवाराला सहित व बच्चे कपंनी किलबिलाट व आंबीलचा आस्वाद घेत साजरा करण्यात आला.

महाराष्ट्रातील उस्मानाबाद, लातूर आणि बीड परिळच्या काही भागामध्ये दर्श अमावस्या शेतात साजरा होणार सण म्हणजे वेळ अमावस्या. या दिवशी गावात शुकशुकाट दिसून येतो तर शेत शिवार अबाल वृद्धाच्या गर्दीने फुलून जाते. काहीजण शेताशेतात आमंत्रणाचा मान स्वीकारत फिरताना दिसून येतात.

**नागीरकांनी घेतला वन भोजनाचा आनंद –**

शेतकरी आपल्या सर्व कुटुंबासह



शेतात जाऊन काळ्या आईची मनोभावी पुजा करून वन भोजनाचा आनंद घेतला त्यामुळे शेत शिवार गजबजले होते. शहरात राहणारे नागरिक व मुले वेळ अमावस्यानिमित्ताने गावी येऊन आपल्या कुटुंबासह शेतात सण साजरा करतात या सणादिवशी बळीराजा आपल्या मित्रा सह आपल्या नातेवाईकांना शेतात घेऊन जातात ज्वारीच्या कडव्या पासून तयार केलेल्या पेंडयाची कोपी करून त्यामध्ये पंडवाची पुजा करण्यात आली पुजा झाल्यानंतर नागीरकांनी जेवणाचा आनंद घेतला तर लहान मुलांनी शेतात खेळण्या आनंद घेतला

**काय आहे वेळ अमावस्या**

**लातूर** - उस्मानाबाद जिल्ह्यातसह कर्नाटक तील सीमावर्ती भागात हा सण साजरा केला जातो

शिवार पुजा वेळ अमावस्या येळवस, येळमासी आशा विविध नावाने हा सण ओळखला जातो.

या सणाचे लिखित संदर्भ उपलब्ध नसले तरी काळ्या आईच्या ऋणातुन उतराई होण्यासाठी हा सण साजरा केला जातो असे जेष्ठ लोक सांगतात. या दिवशी गाव निर्मनुष्य होतात शिवार फुलून जातात. व्यवसाय व नोकरीनिमित्त शहरात गेलेली मंडळी या सणासाठी सहकुटुंब गावी परतात गाव शहरात अघोषित संचारबंदी लागल्याचा अनुभव या दिवशी येतो

**भज्जी आणि आंबील –**

या सणा निमित्त विविध पदार्थ बनवले जातात त्यात चना पिठात विविध भाज्याची मिसळ करून हा मानाचा पदार्थ असतो भज्यासाठी मटार वाल्याच्या शेंगा तुरीचे हिरवे दाने, काकडी, वांगे, मेथी, कांदा पाथ लसूण पात कोथिंबीर, हिरवे चिंच व गजाराचा वापर केला जातो. ज्वारीचा आंबट भात, तांदळाची खीर ज्वारीची भाकरी वरण असे अनेक पदार्थ दुसरा मानाचा मेनू आहे. झनझनीत आंबील आंबट ताकात थोडची ज्वारीचे पीठ शिजूवन टाकले जाते. मीठ, जिरपुडे, कोथिंबीर,लसणाचे वाटन मिर्ची पावडर त्यात टाकले जाते. ती नव्या मडक्यात ठेवतात तत पूर्वी मडके चुण्याने रंगवले जाते.

# वेळ अमावस्याला शेतकऱ्यांनी केली शेतात पूजा

## जाणून घ्या परंपरा आणि महत्व

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.३०, कळंब (धाराशिव)** : वेळ अमावस्येला ग्रामीण भागात 'येळवस अमावस्या' असं म्हटलं जातं. मूळात हा शब्द 'येळी अमावस्या' असून त्याचे नामकरण हे 'वेळ किंवा येळ अमावस्या' असे झाले.

कर्नाटक राज्यात पेरणीनंतर येणारी सातवी अमावस्या म्हणजे ही येळवस असते. या दिवशी शेतात समृद्धी, सुबत्ता लाभावी अशी प्रार्थना घरच्या लक्ष्मीसह शेतकरी मायबाप लक्ष्मीआई पुढे करत असतात. सर्वदात्या धरती माय-माऊलीचे आपण काहीतरी देणं लागतो. या पवित्र भावनेने कर्नाटक आणि लगतच्या भागात म्हणजे आपल्या मराठवाड्यातील धाराशिव, बीड, लातूरआणि इतर काही भागात शेतकरी बांधव येळवस मोठ्या आनंदाने साजरी करण्याची जुनी प्रथा आहे. वेळ अमावस्येदिवशी शेतामध्ये कडब्याची खोप करून शेतातल्या लक्ष्मीची पूजा केली जाते. तसेच पिकांची देखील पूजा केली जाते.

आंब्याच्या झाडाखाली पाच दगडांना चुण्याने रंगवून पांडवाची पूजा केली जाते. खरं तर येळवण प्रथा शेतकऱ्यांसाठी एक वेगळीच आनंददायी पर्वणी असते.

इंग्रजी महिन्यांप्रमाणे साधारणतः



डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात ही अमावस्या असते. या दिवसात पेरलेली पिके बहरलेली असतात. वातावरणात थंडी असते. त्यामुळे अशा दिवसांत जेवण जास्त जातं आणि ते शरीराला आवश्यकही असते. अशावेळी शेतकरी मंडळी आपल्या मित्र-मैत्रिणी, पाहुणे, शेजारी अशांना आपल्या शेतात आदराने जेवायला येण्याचं निमंत्रण देतात. जसा हा सण निराळा आहे. तसाच यासाठी बेतही निराळाच असतो.

**महाराष्ट्रातील येळवसची परंपरा नेमकी काय आहे ?**

भारतात सिंधूकालिन संस्कृतीपासून नदीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तेव्हापासून जलपूजन करण्याची परंपरा चालत आलेली आहे. गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधू आणि कावेरी या सात नद्या (सप्त सिंधू) भारतीय लोकपरंपरेत अतिशय पवित्र समजल्या जातात. त्यामागे त्यांच्या प्रती असलेली कृतज्ञता व्यक्त होते. त्याच सप्तसिंधू नदयांना आराध्य म्हणून पुजण्याची परंपरा सुरू झाली. लोक नदीच्या पाण्याचे पुजन करु लागले. पण कालांतराने बारा महिने वाहणाऱ्या नद्या आटल्या.

शेतकऱ्यांनी शेतात वावरातील पीक भिजवण्यासाठी, पिण्याच्या पाण्याकरिता विहिरी खोदल्या. आता त्यातले पाणी हे या सप्त सिंधूचे प्रतिक म्हणून पुजली जाते. शेतात असलेल्या विहरीच्या जवळ प्रतिकात्मक ७ दगडांना रंगवून त्याला पुजनाची परंपरा सुरु झाली आणि त्यांना आसरा म्हणून ओळखले जाऊ लागले.

आसराचे महत्व आसरा म्हणजे तूच आमची राखण करणारी, सहारा देणारी, पाणी पाजणारी. याच आसराची पूजा येळवसच्या दिवशी प्रत्येक शेतात ज्वारीच्या कडब्याच्या पेंढ्यांची खोप करुन केली जाते.

शेतकरी बांधव संध्याकाळी ज्वारीच्या पेंढीचा टेंभा करुन शेतातल्या गहू, हरभरा या पिकांवरून तो ओवाळतात, जेणेकरून रबी हंगामातल्या या पिकांना कुणाची नजर लागू नये. त्यानंतर शेतकरी मंडळी घराकडे परततात.

**सहकुटुंब, मित्रमंडळींसह वनभोजनाचा आनंद**

बाजरीपासून बनवलेले उंडे, बाजरी, ज्वारीच्या कडक भाकरी, विविध पालेभाज्यापासून बनवलेली भाजी (भाजी), वांगी, कांद्याची भरीत, गव्हाची खीर, कोंदीच्या गोड पोळ्या, आंबट भात (खिचडा) आणि वरून चवदार अंबिलाचा घोट घेत दुपारी साडेबारानंतर शेत शिवारात वनभोजनाचा शेतकरी कुटुंब व मित्रपरिवारांनी मनसोक्त स्वाद घेतला. वनभोजनानंतर कडवट - अंबट बोर, हिरव्या चिंचा आणि मधमाश्यांनी संकलित केलेल्या मोहळ मारून त्याचा आस्वाद घेण्यासाठी तरूण, चिमुकले बांधा, बांधावरून फिरत होते.

> आम्ही मुला बाळासह दर वर्षी मोठ्या आनंदात येळ अमावस्या साजरी करत असतो. त्याचबरोबर मित्र मंडळीला सुध्दा निमंत्रण देत असतो. या दिवशी शेतात मोठ्या भक्तीभावाने पूजा केली जाते. त्यामुळे सुख, समृद्धी लाभते अशी प्रथा आहे.
> **- उद्धव जग्गनाथ शेळके, शेतकरी (खामसवाडी)**

# उदगीर तालुक्यात वेळ अमावस्या उत्सात साजरी

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.३०, उदगीर (लातूर) :** भारत कृषिप्रधान देश असल्याने देशात शेतीशी संबंधित अनके सण, उत्साव साजरे होतात. यातीलचं एक सण म्हणजे वेळ अमावस्या. दरवर्षी या सणाचा एक मोठा उत्साह पाहायला मिळतोय. या सणानिमित्त दरवर्षी शेतातील काळ्या आईचे ऋण फेडण्यासाठी तिची पूजा केली जाते. मूळ कर्नाटकी असणारा हा सण महाराष्ट्रात उस्मानाबाद, लातूर, सोलापूर आणि परळीचा उर्वरित भागात साजरा होतो. वेळ अमावस्या निमित्त सर्व शेतकरी

काळ्या मातीच्या उपकारातून उतराई होण्याचा कृषी संस्कृतीचा महत्त्वाचा सण



म्हणजे वेळअमावस्या. सोनं पिकवणाऱ्या मातीच्या प्रती असलेली श्रद्धा आणि निष्ठा व्यक्त करण्याचा दिवस .

कुटुंबातील सर्व सदस्य थोर, लहान शेतात गोळा होतात. या काळ्या आईची पूजा करतात. तिला गोडाधोडाचा नैवद्य दाखवत आणि वनभोजनाचा आनंद लुटत असतात. वेळ अमावस्येला बोली भाषेत येळवस असेही म्हटले जाते.

यावेळी शेतातील पांडवांना नवा रंग दिला जातो. तसेच रब्बी हंगामातील गहू, हरबरा, ज्वारी, करडई, सुर्यफुल आदी पिकात चर शिंपून रब्बीचा हंगाम चांगला होऊ दे, अशी देवीकडे प्रार्थना केली जाते.

**वेळ अमावस्या हिवाळ्यातच का साजरी होते ? -**

उत्साह आणि नवचैतन्य निर्माण करणारा ऋतू म्हणून हिवाळा मानला जातो. आयुर्वेदानुसार, हिवाळा ऋतूनुसार घेतला जाणारा आहार शरीरास पोषक असतो.त्यामुळे तब्येत ही तंदुरुस्त राहते. या दिवसांत फळ आणि पालेभाज्या खाण्याचा सल्ला दिला जातो. या ऋतूत प्रचंड भूक लागते तसेच पचनसंस्था चांगली राहते. शरीर कोरडं आणि रुक्ष पडू नये यासाठी अनेकदा स्निग्ध पदार्थांची आवश्यकता असते. त्यामुळे या दिवसांत दूध, तूप, दहीस लोणी यांचा आहारात समावेश करावा. यामुळे वेळ अमावस्याला भाकरी भजी आंबिल आणि गरम पदार्थ यांची घरोघरी एक मेजवानी असते.

# ३१ डिसेंबर २०२४ सरते वर्षाला निरोप देण्याकरिता पोलिस यंत्रणा सज्ज

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.३०, कल्याण (ठाणे) :** परिमंडळ ३ कल्याण मधील सर्व पोलीस ठाण्यामध्ये दिनांक ३१ निमित्त बंदोबस्त लावण्यात येणार असून सदर बंदोबस्त करिता २ सहाय्यक पोलीस आयुक्त, ८३ पोलीस अधिकारी, ५३२ पोलीस अंमलदार असा पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

परिमंडळातील सर्व पोलीस ठाण्यामध्ये पोलीस ठाणे निहाय एकूण



१. नाकाबंदी १७ ठिकाणी
२. फिक्स पॉईट व पायी पेट्रोलिंग
३. बीट मार्शल पेट्रोलिंग २७
४. पेट्रोलिंग मोबाईल २०
५. प्रतिबंधक पथक ८
६. छेडछाड विरोधी पथक ८
७. बार आस्थापना चेकिंग पथक ८
८. तपास पथक ८
९. गोपनीय पेट्रोलिंग पथक ८ इत्यादी कार्यरत राहणार आहेत. तसेच वाहतूक शाखेचे ८ ब्रेथ एनालायझर मशीन सह १० ठिकाणी नाकाबंदीचे आयोजन केले जाणार आहे.

# थोडक्यात

## माथेरानच्या क्रीडा संकुलाची दयनीय अवस्था; क्रीडाप्रेमी मध्ये तीव्र नाराजी




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.३०, माथेरान :** जिल्ह्यातील सर्वात मोठे क्रीडा मैदान म्हणून माथेरानचे वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल (ऑलिंपिया मैदान) हे प्रसिद्ध मैदान असून या मैदानावर जानेवारी पासून मार्च महिन्यापर्यंत टेनिस बॉल क्रिकेट सामने आयोजित करण्यात येतात. तर मे महिन्यात अश्व शर्यतीचे आयोजन करण्यात येते. क्रिकेटचे सामने पाहण्यासाठी इथे प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. जवळपास २५ एकरांमध्ये ह्या मैदानाची व्याप्ती असून गावापासून दूरवर हे मैदान आहे. याच मैदानाच्या सुशोभीकरण आणि दुरुस्तीसाठी मागील काळात जवळजवळ ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु अयोग्य नियोजनामुळे त्या मैदानाच्या विकास कामांचा पुरता बोजवारा उडाला आहे. स्टेडियम मधील शेडचे पत्रे गायब झालेले असून उन्हाळ्यात प्रेक्षकांना झाडांचा आधार घ्यावा लागत आहे. तर दूरवरून क्रिकेट सामने पाहताना सुध्दा ज्या जांभ्या दगडांचा अनाठायी वापर करून एकप्रकारे ह्या मैदानाला बकालपणा आणलेला असल्याने हे मैदान पूर्णपणे विद्रुप झालेले दिसत आहे. निदान प्रेक्षकांना उन्हापासून बचाव करण्यासाठी स्टेडियम वर पत्रे लावण्यात यावेत जेणेकरून कुणाला ही उन्हाच्या झळांना सामोरे जावे लागणार नाही. प्रेक्षकांना क्रिकेट सामने पाहताना मनसोक्तपणे आनंद घेता येईल. यासाठी संबंधित खात्याने याबाबत ठोस उपाययोजना करावी. अशी समस्त क्रीडाप्रेमीं मधून मागणी केली जात आहे.

## रा.फ. नाईक विद्यालय बोनकोडे येथे रंगला स्नेहसमेलन सोहळा

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.३१, ठाणे, (नवी मुंबई) :** कोपरखैरणे नवी मुंबई येथे श्रमिक शिक्षण मंडळाचे रा.फ.नाईक विद्यालय, बोनकोडे मध्ये पूर्व प्राथमिक विभाग मराठी व इंग्रजी माध्यम तसेच प्राथमिक विभाग मराठी व इंग्रजी माध्यम यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा नुकताच शाळेच्या मैदानात अतिशय उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमाचे नाव स्पंदन म्हणजेच एक मनमोहक अनुभव असे होते.



कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून कल्पना संजीव नाईक, कल्याणी संदिपजी नाईक व काजल सागर नाईक या उपस्थित होत्या. तसेच संचालक मंडळातील सदानंद म्हात्रे व शाळेचे प्रशासकिय अधिकारी नरेंद्र म्हात्रे त्यांच्या पत्नीसह उपस्थित होते. माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक रविंद्र पाटील व माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सिमा म्हात्रे हे देखिल उपस्थित होते. चिमुकल्यांनी सादर केलेल्या कलाकृतीने संपूर्ण प्रेक्षक वर्ग भारावून गेला. विविध कार्यक्रमातून दिला जाणारा सामाजिक संदेश हे कार्यक्रमाचे विशेष होते. अगदी शेवटच्या प्रस्तुती पर्यंत प्रेक्षक आपल्या जागेवर खिळून होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तिन्ही विभागाच्या मुख्याध्यापिका इलेन फर्नाडीस, राजश्री यादव व सुमती सुपय्या यांचे योग्य मार्गदर्शन, शिक्षकांनी कार्यक्रम पूर्ततेसाठी केलेली मेहनत, सर्व सहभागी विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य व पालकांचा सहभाग मोलाचा होता.

## पंढरपूर पत्रकार संघ अध्यक्षपदी कोकरे, कार्याध्यक्ष ढवळे तर उपाध्यक्षपदी सरवळे, कदम यांची सर्वानुमते निवड

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३०, पंढरपूर :** पंढरपूर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ संलग्न पंढरपूर पत्रकार संघाची नूतन कार्यकारणी निवडी संदर्भात पत्रकार भवन येथे पंढरपूर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष हरिभाऊ प्रक्षाळे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या प्रसंगी सर्वानुमते नूतन पुढील वर्षाकरिता नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामध्ये पंढरपूर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संजय कोकरे, कार्याध्यक्षपदी राजेंद्र ढवळे, उपाध्यक्ष पदी विकास सरवळे, महेश कदम,सचिवपदी विनोद पोतदार, सहसचिवपदी कल्याण कुलकर्णी, खजिनदारपदी कबीर देवकुळे तर प्रसिद्धीप्रमुखपदी व युट्युब मीडिया अध्यक्ष पदी रफिक आता तर youtube मीडिया उपाध्यक्षपदी अश्फाक तांबोळी (देवळे) यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार संघाचे मावळते अध्यक्ष अपराजित सर्वगोड यांच्या हस्ते करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. निवडीनंतर नूतन अध्यक्ष संजय कोकरे यांनी पुढील काळात पत्रकार बांधवांसाठी विविध सामाजिक उपक्रम, पत्रकारांची कार्यशाळा,विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान याचबरोबर पत्रकारांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तसेच पत्रकारांच्या विविध समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी पंढरपूर पत्रकार संघाचे मावळते अध्यक्ष अपराजित सर्वगोड, राजकुमार शहापूरकर, दिनेश खंडेलवाल, अविनाश साळुंखे, नवनाथ खिलारे, विठ्ठल जाधव, विकास पवार यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

## ६ जानेवारीला लोकशाही दिन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, नांदेड :** जिल्हा प्रशासनाच्यावतीने सोमवार, दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी लोकशाही दिनामध्ये आपल्या तक्रारीसह उपस्थित व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यादिवशी महसूल, गृह, जिल्हा परिषद, पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हास्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडे लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, परिसर येथे उपस्थित राहतील. निवेदन नोंदणीची सुरूवात दुपारी १२ वा. होणार आहे. त्यानंतर लगेच प्राप्त झालेल्या अर्जावर सुनावणी घेण्यात येणार आहे. नागरिकांनी दुपारी १ ते ३ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात उपस्थित रहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे.